NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

दिनांक ०३.११.२०२६ मंगळवार

(कामगिरी)

१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :–

दिनांक ०२.११.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०३ केसेसमध्ये ०३ ईसमावर कारवाई करून एकुण २,०६०/–रू. चा मुद्देमाल जप्त केला. तसेच, जुगार कायद्यान्वये ०६ केसेसमध्ये १५ ईसमांवर कारवाई करून एकुण ६७,३७५/–रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. त्याचप्रमाणे, दिनांक ०२.११.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक ०३.११.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये १८ इसमांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये, ओव्हरस्पीड वाहन चालविणे कलम १८४ मोवाका ३४ केस, सिग्नल जंपींग कलम २३९/१७७ मोवाका अन्वये ७० केसेस, विना परवाना वाहन चालविणे कलम १३० मोवाका अन्वये १२९ केसेस, ऑन रोड पार्कींग कलम १२२/११७ मोवाका अन्वये २९१ केसेस, रॉंग साईड कलम ४/१२२ मोवाका अन्वये ९३ केसेस, अवैध प्रवासी वाहतुक कलम १९४(ए) मोवाका अन्वये ३९ केसेस, ड्रायव्हींग विदाऊट युनिफार्म कलम २१/१८ मोवाका अन्वये १६ केसेस, ट्रिपलसिट वाहन चालविणे कलम १२८/१७७ मोवाका अन्वये १५७ केसेस, धोकादायकरित्या बेदरकारपणे वाहन चालविणे कलम १८४ मोवाका अन्वये ०७ केस, फॅन्सी नंबरप्लेट कलम ५१/५० सीएमव्हीआर अन्वये २९ केसेस, विदाऊट सिटबेल्ट ड्रायव्हींग कलम १९४ बी(१) मोवाका अन्वये १२ केसेस, विना हेल्मेट गाडी चालविणे कलम १२९/१७७ मोवाका अन्वये १,०८८ केसेस, वाहन चालवितांना भ्रमणध्वनीचा वापर करणे कलम १८४(सि) अन्वये २१ केस, ड्रंकन ड्राईव्ह कलम १८५ मोवाका अन्वये ४१ केसेस व इतर कलमांखालील वेगवेगळे गुन्हे असे एकुण २,१५५ वाहन चालकांवर कारवाई करून त्यांचेकडून एकूण रू. ७,०७,५५०/–रू. इतके तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

२) गुन्हेशाखा युनिट क्र. ०४ पोलीसांची कामगीरी :– वाहन चोरी करणाऱ्या आरोपीस अटक. ०४ गुन्हे उघडकीस आणुन ३,२०,०००/– रु. चा मुद्येमाल जप्त.

दिनांक २८.१०.२०२६ चे १२.३० वा. ते १४.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीत विज्ञान नगर, परातेचे घरासमोर, रुस्तमजी हाईटस्जवळ, मानेवाडा रोड, नागपूर येथे राहणारे फिर्यादी प्रांजल अक्षय वरखडे वय २४ वर्षे यांनी त्यांची होन्डा ॲक्टिवा गाडी क्र. एमएच ३२ एझेड ३०९३ किंमती ८०,०००/–रू. ची घरासमोर लॉक करून, पार्क करून ठेवली असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची नमुद गाडी चोरून नेली.

फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हयाचे समांतर तपासादरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. ०४ चे अधिकारी व अंमलदार हे गुन्हेगारांचे शोधात पेट्रोलींग करीत असता, त्यांना खात्रीशीर माहीती मिळाली की, दोन मुले केडीके कॉलेज मैदानाजवळ चोरीचे वाहनासह वावरत आहेत. अशा माहितीवरुन, नमुद ठिकाणी गेले असता, तेथे त्यांना प्राप्त वर्णनाची दोन मुले मिळुन आली. त्यांचेकडे जात असता, ते पोलीसांना पाहुन पळु लागले. त्यांचा पाठलाग करुन त्यांना ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यांची नावे विचारली असता, त्यांनी आपली नावे आशिष उर्फ प्रणित उर्फ रफ्तार शैलेष वाघमारे वय २० वर्षे, रा. कडबी चौक, लुंबिनी नगर, मेकोसाबाग, जरीपटका, नागपूर असे सांगुन दुसरा एक अल्पवयीन मुलगा असल्याचे निष्पन्न झाले. त्यांना त्यांचेजवळील वाहनाबाबत विचारपुस केली असता, त्यांनी वर नमुद गुन्हयातील वाहन चोरीचे असल्याची कबुली दिली. तसेच अधिक सखोल विचारपूस केली असता, त्यांनी वर नमुद गुन्हयाव्यतिरिक्त, पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीत—०१, अजनी—०१, तहसील—०१ असे एकुण ०४ गुन्हे संगनमताने केल्याची कबुली देऊन, गुन्हयातील दुचाकी वाहने केडीके कॉलेजचे आतील भागात ताडपत्रीने झाकुन ठेवल्याचे सांगितले. आरोपी व विधिसंघर्षग्रस्त बालकाचे ताब्यातुन १) होन्डा ॲक्टिवा गाडी क्र. एमएच ३२ एझेड ३०९३ २) हिरो होन्डा स्प्लेंडर दुचाकी क्र. एमएच ३१ एझेड ८४२२ ३) हिरो होन्डा स्प्लेंडर दुचाकी क्र. एमएच ३१ एफटी ५४२९ ४) टिव्हीएस अपाचे दुचाकी क्र. एमएच ४९ बीवाय ७६४० अशी चोरी केलेले एकुण ०४ दुचाकी वाहने किंमती अंदाजे ३,२०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपी व विधिसंघर्षग्रस्त बालकास मुद्देमालासह पुढील कारवाईकामी हुडकेश्वर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी, सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, मपोनि. श्रीमती संजीवनी थोरात व त्यांचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.



<u>३) गुन्हेशाखा सामाजिक सुरक्षा विभाग पथक पोलीसांची कामगिरी :— स्पा चे नावाखाली देहव्यावसाय करवुन घेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>

दिनांक ०२.११.२०२६ चे १६.१० वा ते २०.१५ वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा सामाजिक सुरक्षा विभाग पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असतांना, त्यांना अवैध देहव्यवसायाबाबत मिळालेल्या

खात्रीशीर माहितीवरून, त्यांनी पोलीस ठाणे कोतवाली हद्दीत, शारदा चौक, गणेशनगर येथील वंदना अपार्टमेंटमधील एस.एम. स्पा येथे पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, तेथे स्पा मालक महिला आरोपी नामे १) शाबा परवीन मुनव्वर शेख वय ३६ वर्ष रा. दसरा रोड, अरब चा वाडा, भुतिया दरवाजा, महाल, नागपूर व मॅनेजर नामे २) शेख मोहसीन मुन्ना शेख वय २८ वर्ष रा. प्लॉट क्र. ३४१, नंदनवन रोड, लक्ष्मीनारायण मंदीरजवळ, नंदनवन, नागपुर हे संगनमताने स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता ०१ पिडीत महिलेस कमी वेळेत जास्त पैसे कमविण्याचे आमिष देऊन, घटनास्थळी स्पा येथे जागा व ग्राहक उपलब्ध करुन देऊन, तिचेकडून अनैतिक देहव्यापार करवून घेताना, समक्ष मिळून आले. आरोपींचे ताब्यातुन रोख ३,०००/—रू., ०३ मोबाईल व इतर साहित्य असा एकुण किंमती अंदाजे ४५,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींविरूध्द पोलीस ठाणे कोतवाली येथे कलम १४३(२)(३),३(५) भा.न्या.सं., सहकलम ३,४,५,७ अनैतिक देहव्यापार प्रतिबंधक अधिनीयम—१९५६ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपींना मुद्देमालासह पुढील कारवाईस्तव कोतवाली पोलीसांचे ताब्यात देण्यात आले. पुढील तपास सुरु आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी, सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. दर्शन पाटील, सपोनि. शिवाजी ननवरे, पोहवा. सुशिल बहिरे, किशोर ठाकरे, मपोहवा. आरती चव्हाण, पोअं. नितीन वासनिक, कुणाल बोडखे, कमलेश क्षिरसागर व मपोअं अश्विनी खोडपेवार यांनी केली.



<u>४) गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथकाची कामगिरी :— एम.डी. पावडर बाळगणाऱ्या आरोपींना अटक.</u>

दिनांक ०३.११.२०२६ चे ०४.१० वा. ते ०६.२० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे सक्करदरा हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना, त्यांना माहिती मिळाली की, भांडेप्लॉट चौक, विशाल मेगामार्ट समोर, सार्वजनिक रोडवर एका डिओ मोपेडसह दोन इसम एमडी पावडर विक्रीकरीता बाळगुन उभे आहेत. अशा खात्रीशीर माहितीवरुन, नमुद ठिकाणी जाऊन पडताळणी केली असता, तेथे दोन इसम डिओ मोपेडसह संशयीत हालचाली करतांना दिसुन आले. त्यांना घेराव टाकुन ताब्यात घेतले व पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्यांनी त्यांचे नांव १) सुरज गोपाळराव कठाने वय ३० वर्षे २) हर्षल विनोद अबगड वय २५ वर्ष दोन्ही रा. नंदनवन झोपडपट्टी, गली क्र. ३, पोलीस चौकीमागे, नंदनवन,

नागपूर असे सांगीतले. त्यांचेजवळ अंमली पदार्थ असल्याचे दाट संशयावरून, त्यांची व मोपेडची झडती घेतली असता, त्यांचे ताब्यात झिपलॉक पन्नीमध्ये एकुण ५२.७०० ग्राम वजनी एम.डी. पावडर मिळून आली. आरोपींना अधिक विचारपुस केली असता, त्यांनी नमुद एमडी पावडर ही त्यांचे साथीदार पाहीजे आरोपी नामे १) हाशिम शेख वय २५ वर्षे, रा. बगडगंज, गार्डनजवळ, नागपुर २) ईशांत उर्फ गोल्डी निकोलसे वय ३५ वर्ष रा. बगडगंज प्लॉस्टीक कंपनीजवळ, नागपूर ३) प्रविण टेंपे वय ३२ वर्ष रा. पाचपावली नागपूर यांचे मदतीने विक्रीकरीता आणल्याचे सांगितले. आरोपीचे ताब्यातुन एम.डी. पावडर, ०३ मोबाईल व डिओ मोपेड असा एकुण २,६८,१००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी हे स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता एम.डी. पावडर विक्री करण्याकरीता बाळगताना समक्ष मिळुन आले. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क),२२(क),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे सक्करदरा येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपींना अटक करून, त्यांना मुद्देमालासह पुढील कारवाईस्तव सक्करदरा पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पाहीजे आरोपींचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी, सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली पोनि. भारत क्षिरसागर, सपोनि. आनंद बिचेवार, पोहवा इमरान शेख, ज्ञानेश्वर भोगे, गणेश जोगेकर, विवेक आढाऊ, मपोहवा. अनुप यादव, पोअं. संतोष शेंद्रे व नितीन राठोड यांनी केली.



५) गुन्हेशाखा युनिट क्र. १ पोलीसांची कामगिरी :— प्रतिबंधीत नायलॉन मांजा बाळगणारा विधीसंघर्षग्रस्त बालक ताब्यात.

दिनांक ०२.११.२०२६ चे २१.०० वा. चे सुमारास, गुन्हेशाखा युनिट क्र. १ पथकाचे अधिकारी व अंमलदार हे गुन्हेगारांचे शोधार्थ पेट्रोलींग करीत असतांना, त्यांना माहिती मिळाली की, पोलीस ठाणे एमआयडीसी हद्दीत, जयताळा, शांतीनाथ अपार्टमेंट जवळ एक मुलगा काळया रंगाचे बॅगसह नायलॉन मांजा विक्रीकरीता बाळगुन आहे. अशा माहितीवरुन नमुद ठिकाणी गेले असता, तिथे प्राप्त वर्णनाचा एक मुलगा दिसुन आला. त्यास ताब्यात घेऊन त्याचे नाव पत्ता विचारले असता, तो अल्पवयीन असल्याने निष्पन्न झाले. पंचासमक्ष त्याचे

जवळील काळया बॅगची पाहणी केली असता, त्यामध्ये शासनाने प्रतिबंधीत केलेला नायलॉन मांजा मोनोकाईट लेबल असलेल्या ०६ चक्की मिळुन आल्या. त्याचे ताब्यातुन चक्की व काळी बॅग असा एकुण १८,५००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. विधीसंघर्षग्रस्त बालकाचे कृत्य हे कलम २२३ भा.न्या.सं., सहकलम ५, १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम—१९८६ अन्वये होत असल्याने त्याचेविरूध्द पोलीस ठाणे एमआयडीसी येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यास मुद्देमालासह पुढील कारवाईकामी एमआयडीसी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी, सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली पोनि. प्रशांत ठवरे व त्यांचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.



(गुन्हे)

१) पोलीस ठाणे अजनी :—शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.

दिनांक ०३.११.२०२६ चे ०२.०० वा. चे सुमारास, अजनी पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, कत्थ्या रंगाचा स्वेटर व काळी जिन्सपॅन्ट घातलेला सावळया रंगाचा, १९ ते २० वर्षीय वयोगटातील एक इसम आपले जवळ खंजर सारखे शस्त्र घेऊन, चिमणी चौकाजवळ फिरत आहे. अशा खात्रीशीर माहितीवरुन, परिसरात शोध घेतला असता, प्राप्त वर्णनाचा एक इसम पायदळ फिरतांना दिसुन आला. त्यास ताब्यात घेऊन पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव रौनक महेश बैसवारे वय १९ वर्षे, रा. बाबुलखेडा, धोबीघाट, अजनी, नागपूर असे सांगीतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे जिन्सपॅटमध्ये एक लोखंडी खंजर मिळुन आला. आरोपीस अधिक सखोल विचारपुस केली असता, त्याने चिमणी चौक जवळील इलेक्ट्रीक डिपीजवळ दोन शस्त्रे लपवुन ठेवल्याचे सांगितले. आरोपीचे ताब्यातुन एक लोखंडी खंजर, एक लोखंडी स्टीलसारखी कुऱ्हाड व एक लोखंडी तलवार अशी ०३ शस्त्रे एकुण किंमती १,३००/—रू. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने शस्त्रे बाळगुन समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे फिर्यादी पोअं. मनिष भलमे यांचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे अजनी येथे मपोउपनि. मनिषा झाझुर्डे यांनी आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

(अकस्मात मृत्यु)

पोलीस ठाणे कळमणा :– दिनांक ०३.११.२०२६ चे ०४.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे कळमणा हद्दीत, मनिषा लॉन समोरील, राजीव गांधी नगर, रेल्वे फाटक जवळ एक अनोळखी इसम वय अंदाजे ३० ते ३५ वर्षे वयाचे ज्यांचे उजवे हातावर ओम व त्रिशुल गोंदलेले असुन, त्यांना रेल्वे ची धडक लागुन ते जखमी अवस्थेत मिळुन आले. त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पिटल येथे नेले असता, डॉक्टरांनी तपासुन मृत घोषित केले. मृतकाची अद्याप ओळख पटलेली नाही.

याप्रकरणी फिर्यादी पोअं. कृष्णा मांदळे यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे कळमणा येथे पोउपनि. विजयकुमार गिराम यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

(मिसींग)

पोलीस ठाणे हुडकेश्वर :– फिर्यादी संकेत जागेश्वर निकोसे वय ३० वर्षे, रा. प्लॉट क्र. ८५, पवनपुत्र नगर, हुडकेश्वर, नागपूर यांनी पोलीस ठाण सक्करदरा येथे तक्रार दिली की, त्यांची पत्नी नामे सौ. शुभांगी संकेत निकोसे वय २८ वर्षे, हया दिनांक २८.१०.२०२६ चे १३.०० वा. पासुन पोलीस ठाणे सक्करदरा हद्दीतील नवप्रतिभा विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, सक्करदरा येथून बेपत्ता झाल्या आहेत. त्यांचा शोध घेतला असता, मिळून आल्या नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांना फुस लावून पळवून नेले असावे. अशा फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे सक्करदरा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम १४०(३) भान्यासं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. **बेपत्ता व्यक्तीचे वर्णन–** रंग–निमगोरा, चेहरा–गोल, बांधा–मध्यम, उंची–५ फुट १ इंच, केस–काळे लांब, अंगात– मेहंदी रंगाचा सलवार कुर्ता घातलेले आहे. भाषा– हिंदी/मराठी बोलतात.



सौ. शुभांगी

स्वा/–
(अंकुश राठोड)
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.